**आर.सी.सी. नं.२१६/२०१८**
**निशाणी क्रमांक. ७०**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.**०७** याचा शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री. जी.व्ही. बोर्डे यांचेमार्फत सुरु-

**देवा शपथ खरे सांगतो की,**

**माझे नाव** :- **शरद हिरामन गायमुखे,**
**वय** :- ५७ वर्षे, **धंदा:**
**राहणार** :- राहाता, ता. राहाता.

१. सन २०१३ साली मी उज्वल पॅलेस हॉटेलवर काम करायचो माझ्यासोबत तीन चार कर्मचारी होते. अमित बन्सी डंबीर यांची बलरो गाडी हॉटेल समोरुन चोरीला गेल्याचे मला समजले. गाडीच्या ड्रायव्हरवर चोरीचा संशय होता.

**(साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते)**

२. हे म्हणणे खरे आहे की सन २०१३ साली लक्ष्मण तुपे, गणेश सुपेकर, राजेंद्र महाले व मी हॉटेल उज्वल पॅलेसवर कामाला होतो. हे म्हणणे खरे आहे की राहुल डंबीर हे हॉटेलवर गाडी पार्क करुन गेले होते. हे म्हणणे खरे आहे की राजेंद्र मुरलीधर महाजन यांनी गाडी पार्क केली असुन काउंटरवर गाडीची किल्ली ठेवली असल्याचे सांगीतले. हे म्हणणे खरे आहे की राजेंद्र मुरलीधर याने फोन करुन मला सांगीतले की मी बलोरो गाडी घेवुन माझ्या पत्नीला सोडायला जात आहे व त्यानंतर त्याने आम्ही केलेले फोन उचलले नाही व त्याचा फोन बंद येत होता. हे म्हणणे खरे आहे की दोन तीन दिवस गाडीचा शोध घेतला परंतु गाडी मिळुन आली नाही. हे म्हणणे खरे आहे की राजेंद्र महाजन याच्या विरुध्द हॉटेल मालकाच्या भावाने गाडी न सापडल्याने फिर्याद दिली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो.

सरतपास पुर्ण.

**साक्षीदाराचा जबाब कलम २९९ फौ. प्र.सं. प्रमाणे नोंदविला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

दिनांक:२३/०८/२०२४

( ए. ए. कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.
न्यायालय क्र.२